मध्य रेल्वेच्या २,९६७ ठिकाणी पाणी गुणवत्ता तपासणी



मुंबई, दि. २२ (प्रतिनिधी) : पिण्याच्या पाण्याच्या गुणवत्तेबाबत नियंत्रक आणि महालेखापरीक्षकांच्या (सीएजी) अहवालातील निरीक्षणांनंतर मध्य रेल्वेने आपल्या संपूर्ण नेटवर्कवरील स्थानके, रेल्वे वसाहती आणि कामाच्या ठिकाणी विशेष मोहीम राबवली आहे. मुंबई विभागातील २,९६७ ठिकाणांवरील पिण्याच्या पाण्याच्या यंत्रणेची तपासणी करून पाणी गुणवत्ता चाचणी, टाक्यांची स्वच्छता आणि जलवाहिन्यांच्या देखभालीवर भर देण्यात आला आहे. या मोहिमेदरम्यान तपासलेल्या ३४९ पाण्याच्या नमुन्यांमध्ये जिवाणूजन्य दूषितता किंवा ई-कोलाय आढळले नसल्याचे मध्य रेल्वेने स्पष्ट केले आहे.

सीएजीच्या २०२३-२४ मधील लेखापरीक्षण निरीक्षणात मुंबई विभागातील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, भिवंडी रोड, कल्याण आणि लोणावळा या चार स्थानकांवरील पाण्याच्या नमुन्यांमध्ये ई-कोलाय आढळल्याचा उल्लेख होता. त्यानंतर रेल्वे बोर्डाच्या निर्देशांनुसार मध्य रेल्वेने केवळ या चार स्थानकांपुरती कारवाई मर्यादित न ठेवता मुंबई विभागातील सर्व स्थानके, वसाहती आणि कामाच्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याच्या व्यवस्थेची तपासणी केली. या सर्व ठिकाणांना समान चाचणी आणि देखभाल वेळापत्रकाखाली आणण्यात आले आहे. संबंधित चार स्थानकांवरील ई-कोलायच्या अनुवर्ती चाचण्याही करण्यात आल्या असून त्यामध्ये पाणी सुरक्षित आढळले आहे.

दि. २० ऑगस्ट ते २२ सप्टेंबर २०२६ या कालावधीत राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेत विभागातील २,९६७ ठिकाणांची तपासणी करण्यात आली. यामध्ये पाण्याचे स्रोत, जलगाळण प्रकल्प, भूमिगत व उंच टाक्या, पीव्हीसी टाक्या, पाणी बूथ, नळ आणि पाणी वितरण केंद्रांचा समावेश आहे. या तपासणीत ४१० त्रुटी आढळल्या असून त्यापैकी ३६५ त्रुटी दूर करण्यात आल्या आहेत, तर ४५ त्रुटींवर काम सुरू आहे. विभागातील २,९१३ पाण्याच्या टाक्यांपैकी १,७५३ टाक्यांची विशेष मोहिमेदरम्यान स्वच्छता करण्यात आली. तसेच १,७१६ ठिकाणी टाक्यांना घट्ट झाकणे आणि वायुवीजन व अतिरिक्त पाण्याच्या बाहेर पडण्यासाठीच्या मार्गांवर जाळ्या बसविण्यात आल्या आहेत.

भिवंडीत १७५ किलो प्रतिबंधित मांगूर मासळी जप्त

भिवंडी, दि. २२ (वार्ताहर): भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिका हद्दीत प्रतिबंधित मांगूर मासळीची विक्री होत असल्याच्या तक्रारीनंतर जिल्हास्तरीय मांगूर निर्मूलन समितीने कारवाई करत तब्बल १७५ किलो मांगूर मासळी जप्त केली. कोंडाजीवाडी येथील इम्रान फिश शॉप आणि दुकानासमोर उभ्या असलेल्या महिंद्रा बोलेरो पिकअप वाहनाची तपासणी केल्यानंतर ही मासळी आढळून आली. याप्रकरणी मासेविक्रेता इम्रान नजीर कुरेशी याच्याविरोधात शांतीनगर पोलीस ठाण्यात प्रथम माहिती अहवाल दाखल करण्यात आला आहे.

दि. १० सप्टेंबर रोजी जिल्हास्तरीय मांगूर निर्मूलन समितीने कोंडाजीवाडी येथील इम्रान फिश शॉपवर धाड टाकली. दुकानात रोहू, पंगेशियस आणि रुपचंद या मासळीची तपासणी करताना दोन नग प्रतिबंधित मांगूर मासळी आढळून आली. या दोन नगांचे एकूण वजन ४.५ किलो होते. त्यानंतर स्थानिकांकडून मिळालेल्या माहितीनुसार दुकानासमोर उभ्या असलेल्या महिंद्रा बोलेरो पिकअप ट्रक क्रमांक एमएच ०४ एचएस १२६६ची तपासणी करण्यात आली.

या वाहनातील आठ निळ्या ड्रमची तपासणी केली असता त्यापैकी तीन ड्रममध्ये मोठ्या प्रमाणात मांगूर मासळी आढळून आली. या तीन ड्रममधून एकूण १७१ किलो प्रतिबंधित मांगूर मासळी जप्त करण्यात आली. दुकानात आढळलेली ४.५ किलो मासळी आणि वाहनातून मिळालेली १७१ किलो मासळी मिळून एकूण १७५ किलो प्रतिबंधित मांगूर मासळी समितीने जप्त केली. जप्त केलेली मासळी भिवंडी शहरातील रामनगर, चावींद्रा येथील घनकचरा व्यवस्थापन केंद्रात नेऊन शास्त्रोक्त पद्धतीने नष्ट करण्यात आली.

या प्रकरणी संबंधित मासेविक्रेता इम्रान नजीर कुरेशी याच्याविरोधात शांतीनगर पोलीस ठाण्यात प्रथम माहिती अहवाल दाखल करण्यात आला आहे. वाहनाचा वापर नेमका कोणत्या उद्देशाने करण्यात आला होता, यासह या प्रकरणातील इतर बाबींचीही चौकशी केली जात आहे. ही कारवाई जिल्हास्तरीय मांगूर निर्मूलन समितीच्या मार्गदर्शनाखाली मत्स्यव्यवसाय विभाग, ठाणे-पालघर, भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिका आणि शांतीनगर पोलीस ठाणे यांच्या संयुक्त पथकाने केली. प्रतिबंधित मांगूर मासळीची विक्री व साठवणूक आढळून आल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येत असल्याने या कारवाईकडे मासळी विक्रेत्यांसाठी महत्त्वाचा इशारा म्हणून पाहिले जात आहे.

बैंक ऑफ़ बड़ौदा / Bank of Baroda

बँक ऑफ बडोदा मुंबई मेट्रो पश्चिम क्षेत्रः शारदा भवन, श्री वैकुंठलाल मेहता मार्ग, मिठीबाई कॉलेजसमोर, जुहू विलेपार्ले, मुंबई - ४०००५६.
ई-मेलः recovery.mmwr@bankofbaroda.com

शुद्धिपत्रक

कृपया १९.०८.२०२६ रोजी **'फायनान्शियल एक्स्प्रेस' आणि 'दैनिक प्रातःकाळ'** या वृत्तपत्रांमध्ये प्रकाशित झालेल्या आमच्या "स्थावर मालमत्तांच्या विक्रीसाठी विक्री नोटिशीचा" संदर्भ घ्यावा. सदर नोटिशीमध्ये, अ. क्र. ०४ वरील कर्जदार **मे. प्रभात ट्रेडर्स** यांच्या संदर्भातील, इंडस्ट्रियल आरसीसी बिल्डिंगसाठी २३.०९.२०२६ रोजी १४:०० ते १८:०० या वेळेत नियोजित केलेला **लिलाव रद्द करण्यात आला आहे, असे समजावे.**

सही/-
दनिांकः २२.०९.२०२६ — प्राधिकृत अधिकारी,
ठकिाणः मुंबई — बँक ऑफ बडोदा

जाहीर नोटीस

सर्वसामान्य जनतेला याद्वारे नोटीस देण्यात येते की, माझे अशील **श्री. बकुल जयंतीलाल बगाडिया**, सध्या राहणार बोरीवली, मुंबई आणि **फ्लॅट क्र. १/ए/११ (फ्लॅट क्र. ११, बिल्डिंग क्र. १, विंग ए), दुसरा मजला, जी. बी. जी. जे. सी. एच. एस. लि.**, साईबाबा नगर, एस. व्ही. रोडच्या जवळ, बोरीवली (पश्चिम), मुंबई - ४०००९२ (ज्याला यापुढे "सदर फ्लॅट" असे संबोधले जाईल) चे मालक आहेत.

याद्वारे नोटीस देण्यात येते की, सदर फ्लॅटचा मूळ पहिला **करार जो मे. यू. बी. लुथारिया (एच. यु.एफ.) - विकासक आणि सौ. नलिनी धीरज मुळे - खरेदीदार यांच्यात झाला होता, तो माझ्या अशिलाकडून हरवला/गहाळ झाला आहे**, त्यामुळे त्यांनी बोरीवली पोलीस ठाण्यात या प्रकरणाची तक्रार नोंदवली आहे आणि **ती हरवल्याची तक्रार क्र. १३५३११-२०२६, दिनांक १९/०६/२०२६ अंतर्गत नोंदवण्यात आली आहे.**

जर कोणाला वरील नमूद मूळ करार सापडल्यास किंवा सदर फ्लॅटमध्ये विक्री, वारसा हक्क, ताबा, उत्तराधिकार, गहाणखत, धारणाधिकार, भाडेतत्त्व, बक्षीसपत्र किंवा इतर कोणत्याही मार्गाने कोणताही हक्क, मालकी हक्क, दावा किंवा हितसंबंध असलेल्या कोणत्याही व्यक्तीने/व्यक्तींनी, या नोटिशीच्या प्रकाशनाच्या तारखेपासून **१५ दिवसांच्या** आत आधारभूत कागदपत्रांसह खालील स्वाक्षरीकर्त्यांना लेखी स्वरूपात आक्षेप कळवावा, अन्यथा कोणाचेही असे कोणतेही दावे विचारात घेतले जाणार नाहीत आणि ते सोडून दिले आहेत आणि/किंवा त्याग केले आहेत असे मानले जाईल.

सही/-
श्री. जगदीश त्र्यंबक डोंगरदिवे
वकील उच्च न्यायालय आणि नोटरी (भारत सरकार) प्लॉट क्र. २३२, रूम क्र. १८, श्री मंगल सी. एच. एस. लि., गोराई २, बोरीवली (पश्चिम), मुंबई - ४०००९२.
दिनांकः २३/०९/२०२६ — ठिकाणः मुंबई

जाहीर सूचना

(नादारी आणि दिवाळखोरी संहिता, २०१६ च्या कलम १०२(१) अंतर्गत
(कॉर्पोरेट कर्जदारांच्या वैयक्तिक जामीनदारांसाठी नादारी निराकरण प्रक्रिया))

श्री. किरण पारस छाजेड यांच्या धनकोंच्या माहितीसाठी

संबंधित तपशील		
१.	वैयक्तिक जामीनदाराचे नाव	श्री. किरण पारस छाजेड
२.	वैयक्तिक जामीनदाराच्या बाबतीत नादारी प्रक्रिया सुरू होण्याची तारीख	माननीय एनसीएलटी मुंबई खंडपीठाने आदेश सुनावलाः - **१० ऑगस्ट, २०२६**, तथापि रिझोल्यूशन प्रोफेशनलला या प्रवेश आदेशाची माहिती १६/०९/२०२६ रोजी मिळाली.
३.	रिझोल्यूशन प्रोफेशनल म्हणून काम पाहणाऱ्या इन्सॉल्व्हन्सी प्रोफेशनलचे नाव आणि नोंदणी क्रमांक	श्री. शशांत सुधाकर येवला. नोंदणी क्र.: IBBI/IPA-001/IP-P00310/2017-2018/10574
४.	मंडळाकडे नोंदणीकृत असलेला रिझोल्यूशन प्रोफेशनलचा पत्ता आणि ई-मेल	**पत्ताः** फ्लॅट क्र. ७, इंद्रायणी, गणेश नगर, आग्रा रोडच्या समोर, नाशिक, महाराष्ट्र, ४२२००९. ईमेलः shashantsyeola@gmail.com
५.	दावे सादर करण्याची अंतिम तारीख	**१४ ऑक्टोबर, २०२६**

याद्वारे अशी सूचना देण्यात येते की, माननीय राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण (एनसीएलटी) ने **१० ऑगस्ट, २०२६** रोजी मे. वेलपार फार्मबिझ प्रायव्हेट लिमिटेडचे वैयक्तिक जामीनदार **श्री. किरण पारस छाजेड यांची नादारी निराकरण प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश दिले आहेत.**

श्री. किरण पारस छाजेड यांच्या धनकोंना याद्वारे आवाहन करण्यात येते की, त्यांनी त्यांचे दावे पुराव्यासह **१४ ऑक्टोबर, २०२६** रोजी किंवा त्यापूर्वी नोंद क्र. ४ समोर नमूद केलेल्या पत्त्यावर रिझोल्यूशन प्रोफेशनलकडे सादर करावेत.

दाव्यांचे खोटे किंवा दिशाभूल करणारे पुरावे सादर केल्यास दंड आकारला जाईल.

श्री. शशांत सुधाकर येवला
रिझोल्यूशन प्रोफेशनल
नोंदणी क्र.: IBBI/IPA-001/IP-P00310/2017-2018/10574
दिनांकः २३ सप्टेंबर, २०२६
ठिकाणः नाशिक
एएफए वैधताः ३०/०६/२०२७ पर्यंत

UNITY Small Finance Bank — युनिटी स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड

कलम १३(२) अंतर्गत मागणी नोटीस

नोंदणीकृत कार्यालयः वसंत लोक, वसंत विहार, नवी दिल्ली - ११००५७
कॉर्पोरेट कार्यालयः सेंट्रम हाऊस, विद्यानगरी मार्ग, कलिना, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई - ४०००९८

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा, २००२ (कायदा) आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ (नियम) च्या तरतुदींअंतर्गत

खालील स्वाक्षरीकर्ते युनिटी स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड (बँक) चे प्राधिकृत अधिकारी असल्याने, सदर कायद्यांतर्गत आणि नियम ३ सह वाचल्या जाणाऱ्या कायद्याच्या कलम १३(१२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, सदर कायद्याच्या कलम १३(२) अंतर्गत मागणी नोटीस बजावून, खालील कर्जदारांना सदर नोटीस प्राप्त झाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत संबंधित नोटिशीमध्ये नमूद केलेली रक्कम परतफेड करण्यास सांगण्यात आले आहे. टपाल शेऱ्यांनुसार काही नोटिसा बजावल्या न गेल्यामुळे, सदर नोटिसा कर्जदारांना पर्यायी मार्गाने म्हणजेच वर्तमानपत्रात प्रसिद्धी देऊन बजावल्या जात आहेत.

अ. क्र.	कर्ज खात्याचा तपशील	सुरक्षित मालमत्ता
१.	**कर्जदारांचे नावः** **१) प्रियांका सचिन बीज (कर्जदार आणि गहाणखतदार)** **२) मिश्राली कीर्तन पाटील (सह-कर्जदार)** **३) कीर्तन सुरेश पाटील (सह-कर्जदार २)** **मंजुरीची तारीखः** ०२/०९/२०२५ **कर्ज खाते क्र.:** UDAANSBL100496 **कर्जाची रक्कमः** रु. ४,००,०००.०० **एनपीए तारीखः** ०२/०८/२०२६ **मागणी नोटिशीची तारीखः** १९/०८/२०२६ (०४/०९/२०२६ रोजी पाठवली) **मागणी नोटिशीतील रक्कमः** रु. ४,४१,३८९.००/- (०५/०८/२०२६ रोजी असल्याप्रमाणे) आणि व्याज व इतर आकारणी	स्थावर मालमत्तेचा तो सर्व भाग आणि पार्सलः घर क्र. ५२८, तळमजला, कणिकपाडा, झेडपी शाळा, कणिकपाडा, ग्रामपंचायत रोडच्या जवळ, वाणगाव, पालघर, मुंबई - ४०११०३ **चतुःसीमा (गहाणखतानुसार):** पूर्वेसः मोकळी जागा पश्चिमेसः मोकळी जागा, उत्तरेसः अंतर्गत रस्ता दक्षिणेसः मोकळी जागा

६० (साठ) दिवसांच्या कालावधीत उपरोक्त देय रकमेची परतफेड करण्यात अयशस्वी झाल्यास, खालील स्वाक्षरीकर्त्यांना कायद्याच्या तरतुदींनुसार उपरोक्त सुरक्षित मालमत्तेवर कारवाई करणे भाग पडेल. कृपया नोंद घ्यावी की, कायद्याच्या कलम १३(१३) नुसार, तुम्हाला येथे संदर्भित कोणत्याही सुरक्षित मालमत्तेचा व्यवहार करण्यास किंवा हस्तांतरण करण्यास, मग ते विक्री, भाडेतत्त्वावर किंवा इतर कोणत्याही मार्गाने असो, मनाई आहे. या तरतुदीचे कोणतेही उल्लंघन हा गुन्हा आहे आणि कायद्यांतर्गत शिक्षेस पात्र आहे.
मागणी नोटिशीची प्रत खालील स्वाक्षरीकर्त्यांकडे उपलब्ध आहे आणि कर्जदारांची इच्छा असल्यास ते सामान्य कार्यालयीन वेळेत कोणत्याही कामकाजाच्या दिवशी खालील स्वाक्षरीकर्त्यांकडून ती प्राप्त करू शकतात.

सही/-
ठिकाणः मुंबई — **प्राधिकृत अधिकारी**
दिनांकः २३-०९-२०२६ — **युनिटी स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड**

इंडियन बैंक / Indian Bank — इलाहाबाद / ALLAHABAD

खार शाखा : दुकान क्र. १४, चौथा रोड, अमोर कमर्शियल प्रिमायसेस को-ऑप. सोसायटी लि., सीटीएस क्र. ई/७८८, खार (पश्चिम), मुंबई-४०० ०५२. ▪ **ई-मेल :** khar@indianbank.bank.in

लॉकर फोडून उघडणे

या जाहिरातीपासून **१५ दिवसांच्या आत** भाडे न भरल्यास, शाखेच्या सोयीनुसार खालील लॉकर फोडून उघडण्यात येतील. लॉकरमध्ये कोणत्याही वस्तू आढळल्यास त्या बँकेच्या प्रचलित मार्गदर्शक तत्त्वांनुसार जाहीर लिलावाद्वारे विकल्या जातील. विक्रीतून मिळालेली रक्कम खर्च व भाड्याच्या थकबाकीसाठी समायोजित करण्यात येईल आणि उर्वरित रक्कम ग्राहकास देय असेल.

अ. क्र.	प्रत्यक्ष लॉकर क्र.	सीबीएस लॉकर क्र.	ग्राहकाचे नाव/नावे
१	२५३	४०००७७०४६८	राम नेणुमल मंघमल कंजानी
२	३२५	४०००६९८०५०	विनोद बी. मखिजा
३	२१३	४५०१०७७७२५	महेश प्रकाश मुन्शी
४	१४८५	४०००४७००७८	सोनिया राज नवानी
५	१४२४	९९१५३११४४६	रानू पांडे, संजीव पांडे, राजीव पांडे

सही/-
दिनांक : २३.०९.२०२६ — शाखा व्यवस्थापक, **इंडियन बँक**

बैंक ऑफ़ बड़ौदा / Bank of Baroda

बँक ऑफ बडोदा मुंबई मेट्रो पश्चिम क्षेत्रः शारदा भवन, श्री वैकुंठलाल मेहता मार्ग, मिठीबाई कॉलेजसमोर, जुहू विलेपार्ले, मुंबई - ४०००५६.
ई-मेलः recovery.mmwr@bankofbaroda.com

शुद्धिपत्रक

कृपया १९.०८.२०२६ रोजी **'फायनान्शियल एक्स्प्रेस' आणि 'दैनिक प्रातःकाळ'** या वृत्तपत्रांमध्ये प्रकाशित झालेल्या आमच्या **"स्थावर मालमत्तांच्या विक्रीसाठी विक्री नोटिशीचा"** संदर्भ घ्यावा. सदर नोटिशीमध्ये, अ. क्र. ०५ वरील कर्जदार **श्रीमती गंगामेली अँथनी लुईस** आणि **श्री. अँथनी आदितद्रविड लुईस** यांच्या संदर्भातील, फ्लॅट क्र. ८०५ साठी २३.०९.२०२६ रोजी १४:०० ते १८:०० या वेळेत नियोजित केलेला **लिलाव रद्द करण्यात आला आहे, असे समजावे.**

सही/-
दिनांकः २२.०९.२०२६ — **प्राधिकृत अधिकारी,**
ठिकाणः मुंबई — **बँक ऑफ बडोदा**

जाहीर नोटीस

या नोटीसीद्वारे सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, सदनिका क्र.४०१, ए विंग, चौथा मजला, श्री. सिद्धिविनायक पार्क को. ऑप. हौसिंग सोसायटी (रजिस्टर नंबर टीएनए/केएलएन/एच एस सी/टीसी/२६६७९/२०१४ दिनांक २८.०७.२०१४) महात्मा फुले रोड, गरिबाचा वाडा, अनमोल नगरी, डोंबिवली पश्चिम ४२१ २०२, सर्व्हे नंबर ६४, हिस्सा नंबर २, जुना सर्व्हे नंबर १२८, मौजे गावदेवी, डोंबिवज पश्चिम ता. कल्याण, जिल्हा ठाणे, तसेच शेअर सर्टिफिकेट नंबर १७ व भाग १६१ ते १७० ही मिळकत श्री. चंद्रकांत धोंडू सावंत यांच्या मालकीची व कब्जेवहिवाटीची आहे. श्री. चंद्रकांत धोंडू सावंत यांचे निधन झालेले असून त्यांच्या पश्चात त्यांची पत्नी श्रीमती सुवर्णा चंद्रकांत सावंत आणि मुलगा श्री. प्रदीप चंद्रकांत सावंत आणि श्री. संदीप चंद्रकांत सावंत आणि श्री. राजदीप चंद्रकांत सावंत व मुलगी सौ. स्मिता विजय पातोळे व सौ. दीपा नितीन सावंत हे वारस आहेत. सदर मिळकत आमच्या सोसायटी या अशिलांकडे श्री. राजदीप चंद्रकांत सावंत यांनी वर नमूद वारसांकडून आपल्या नावे करण्याची मागणी केली आहे. त्यासाठी सब रजिस्ट्रार ऑफिस ४ येथे दिनांक १५.०४.२०२६ रोजी रजिस्ट्रेशन नंबर ७००१/२०२२६ अन्वये सदर मिळकतीबाबत श्रीमती सुवर्णा चंद्रकांत सावंत आणि मुलगा श्री. प्रदीप चंद्रकांत सावंत आणि श्री. संदीप चंद्रकांत सावंत व मुलगी सौ. स्मिता विजय पातोळे व सौ. दीपा नितीन सावंत यांनी हक्क सोड पत्र दिले आहे. सदर मिळकतीबाबत कोणीही व्यक्तीचे वारस हक्क व इतर हक्क तसेच संस्थेचे हक्क हितसंबंध असल्यास अथवा दान, गहाण, बोजा व इतर कोणत्याही अधिकाराने हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत पुढील दिलेल्या वकिल्यांच्या इमेल आयडीवर कागद पत्रांसहित लेखी हरकती नोंदवाव्यात. मुदतीत हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकत बाबत कोणतेही कोणाचेही हक्क नाहीत म्हणून सदर मिळकतींचा व्यवहार पूर्ण करतील व नंतर आलेल्या हरकतीवर सोसायटी बंधनकारक राहणार नाही हे आपणा सर्वांना कळावे.

मो. नंबर
९६९९३४८९९९ / ८१०४९६४३९९
इमेल आयडी :
manishadrane@gmail.com
ॲडव्होकेट सौ. मनिषा राणे

सीएफएम ॲसेट रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड

CFM ARC — thoughtful regeneration

नोंदणीकृत कार्यालयः "ब्लॉक क्र. ए/१००३, वेस्ट गेट, वायएमसीए क्लबजवळ, स. क्र. ८३५/१+३, एस. जी. हायवे, मकरबा, अहमदाबाद - ३८००५१ गुजरात"
कॉर्पोरेट कार्यालयः १ ला मजला, वेकफिल्ड हाऊस, स्प्रॉट रोड, बॅलार्ड इस्टेट, मुंबई - ४०००३८ **ई-मेलः** info@cfmarc.in, sweta.rana@cfmarc.in,
संपर्कः ०२२-४००५५२८२ आणि +९१७२०८९७४५५३ — **सीआयएनः** U67100GJ2015PTC083994

लिलाव रद्द करणे

याद्वारे सर्वसामान्य जनतेला आणि सर्व संबंधित पक्षांना जाहीर नोटीस देण्यात येते की, **जुहू रिअल इस्टेट डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेडशी संबंधित सुरक्षित मालमत्तेच्या लिलावाबाबत प्रातःकाळ आणि बिझनेस स्टँडर्डमध्ये दिनांक २२.०९.२०२६ रोजी दिलेली लिलाव विक्री नोटीस मागे घेण्यात येत आहे.**

त्यानुसार, दिनांक २३.१०.२०२६ रोजी सायं. ०५.०० ते ६.०० वाजेपर्यंत आयोजित केलेला लिलाव रद्द करण्यात आला आहे. उपरोक्त लिलाव नोटिशीनुसार कोणत्याही पुढील बोली किंवा कार्यवाहीचा विचार केला जाणार नाही.

सही/- प्राधिकृत अधिकारी
दिनांकः २३.०९.२०२६ — **सीएफएम ॲसेट रिकन्स्ट्रक्शन प्रा. लि.**
ठिकाणः मुंबई — **सीएफएम एआरसी ट्रस्ट - १५८ चे विश्वस्त या नात्याने कार्यरत**

पंजाब नैशनल बैंक / punjab national bank

एआरएमबी, मुंबई शहरः ६वा मजला, युनायटेड बँक ऑफ इंडिया टॉवर, सर पी. एम. रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१. ई-मेलः cs6041@pnb.bank.in

शुद्धिपत्रक

कृपया या **वृत्तपत्रात दिनांक ०३.०९.२०२६ रोजी स्थावर मालमत्तांच्या विक्रीसाठी** प्रकाशित झालेल्या **ई-लिलाव विक्री नोटीसचा संदर्भ घ्यावा**, जी कर्जदार **मे. युनिकॉर्न सिंथेटिक मिल्स प्रायव्हेट लिमिटेड (अनु. क्र. १४ आणि १५) आणि कर्जदार मे. युनिकॉर्न सिल्क मिल्स (अनु. क्र. १)** यांच्या संदर्भात होती. ही ई-लिलाव विक्री तात्काळ प्रभावाने मागे घेण्यात आली आहे. ई-लिलावाचे इतर तपशील तसेच राहतील.

सही/-
दिनांकः २२.०९.२०२६ — **प्राधिकृत अधिकारी**
ठिकाणः मुंबई — **पंजाब नॅशनल बँक**

MCPL — मनोज सिरॅमिक लिमिटेड

सीआयएनः L51909MH2006PLC166147
नोंदणीकृत कार्यालयः १, कृष्ण कुंज, १४० वल्लभ बाग लेन, घाटकोपर (पूर्व), मुंबई, महाराष्ट्र, भारत, ४०००७७
दूरध्वनीः +९१-७५०३८ ५४६४६ | **ई-मेलः** compliance@mcplworld.com | **संकेतस्थळः** www.mcplworld.com

येथे सूचना देण्यात येते की, कंपनी कायदा, २०१३ आणि त्याअंतर्गत तयार करण्यात आलेले नियम, सेबी (सूचीकरण जबाबदाऱ्या व प्रकटीकरण आवश्यकता) विनियम, २०१५, भारतीय कंपनी सचिव संस्थेने (आयसीएसआय) जारी केलेले सर्वसाधारण सभांबाबतचे सचिवीय मानक ("एसएस-२") तसेच कंपनी व्यवहार मंत्रालयाने जारी केलेली सर्वसाधारण परिपत्रके ("एमसीए परिपत्रके") यांच्या (असल्यास) तरतुदींचे पालन करून व त्यानुसार, मनोज सिरॅमिक लिमिटेड ("कंपनी") च्या सभासदांची असाधारण सर्वसाधारण सभा ("ईजीएम") **गुरुवार, दिनांक १५ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी १२:३० वाजता (भारतीय प्रमाण वेळेनुसार)** व्हिडिओ कॉन्फरन्सिंग ("व्हीसी")/अन्य दृक-श्राव्य माध्यमां ("ओएव्हीएम") द्वारे आयोजित करण्यात येईल, ज्यामध्ये ईजीएमच्या नोटीसीत नमूद केलेले विशेष कामकाज, कंपनी कायदा, २०१३ ("कायदा") व त्याअंतर्गत तयार करण्यात आलेले नियम आणि भारतीय सिक्युरिटीज व एक्स्चेंज बोर्ड (सूचीकरण जबाबदाऱ्या व प्रकटीकरण आवश्यकता) विनियम, २०१५ तसेच कंपनी व्यवहार मंत्रालयाने जारी केलेल्या संबंधित परिपत्रकांच्या (नवीनतम एमसीए सर्वसाधारण परिपत्रक क्र. ०३/२०२५, दिनांक २२ सप्टेंबर २०२५ ("एमसीए परिपत्रके") आणि सेबीच्या) लागू तरतुदींचे पालन करून, सभासदांच्या समान ठिकाणी प्रत्यक्ष उपस्थितीशिवाय पार पाडले जाईल.

एमसीए परिपत्रकांचे पालन करून, ईजीएमची नोटीस **दिनांक २१ सप्टेंबर २०२६** रोजी, ज्या सभासदांचे ई-मेल आयडी कंपनी/डिपॉझिटरी सहभागी (डीपी)/आरटीएकडे नोंदणीकृत आहेत त्या सर्व सभासदांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने ई-मेलद्वारे पाठवण्यात आली आहे.

ईजीएमची नोटीस कंपनीच्या www.mcplworld.com या संकेतस्थळावर तसेच ई-व्होटिंग एजन्सी, म्हणजेच पूर्वा शेअरजिस्ट्री (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड, यांच्या https://evoting.purvashare.com/ या संकेतस्थळावरही उपलब्ध आहे. ईजीएमच्या नोटीसीत नमूद केलेली सर्व कागदपत्रे सभासदांना ईजीएमच्या दिनांकापर्यंत कोणत्याही शुल्काशिवाय इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पाहण्यासाठी उपलब्ध असतील. अशी कागदपत्रे पाहू इच्छिणाऱ्या सभासदांनी compliance@mcplworld.com या ई-मेलवर संपर्क साधावा असे सुचविण्यात येते.

ज्या सभासदांनी अद्याप त्यांचे ई-मेल पत्ते नोंदणीकृत केलेले नाहीत, त्यांना विनंती करण्यात येते की, डीमॅट स्वरूपात असलेल्या शेअर्सबाबत संबंधित डिपॉझिटरी सहभागींशी संपर्क साधून तसेच भौतिक (फिजिकल) स्वरूपात असलेल्या शेअर्सबाबत कंपनीला लेखी कळवून आपले ई-मेल पत्ते नोंदणीकृत करावेत.

भौतिक (फिजिकल) स्वरूपात शेअर्स धारण करणाऱ्या सभासदांनी त्यांच्या तपशिलांमध्ये सुधारणा किंवा बदल करण्यासाठी कंपनीच्या रजिस्ट्रार आणि ट्रान्सफर एजंटशी, म्हणजेच सुश्री दीपाली धुरी, कम्प्लायन्स ऑफिसर, पूर्वा शेअरजिस्ट्री (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड, युनिट क्र. ९, शिवशक्ती इंडस्ट्रियल इस्टेट, जे. आर. बोरिचा मार्ग, लोअर परळ (पूर्व), मुंबई - ४०००११ यांच्याशी संपर्क साधावा किंवा evoting@purvashare.com या ई-मेलवर किंवा ०२२-४९६१४१३२ आणि ०२२-४९७००१३८ या क्रमांकांवर संपर्क साधावा. डिमटेरियलाइज्ड स्वरूपात शेअर्स धारण करणाऱ्या सभासदांनी त्यांच्या संबंधित डिपॉझिटरी सहभागींशी संपर्क साधावा.

रिमोट ई-व्होटिंग आणि ईजीएम दरम्यान ई-व्होटिंगसाठी सूचना:

- सभासदांना मतदान करण्याची सुविधा ("ई-व्होटिंग") पूर्वा शेअरजिस्ट्री (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड यांच्यामार्फत पुरविण्यात येईल. भागधारक रिमोट ई-व्होटिंगद्वारे किंवा ईजीएम दरम्यान ई-व्होटिंगद्वारे आपले मत कसे नोंदवू शकतात आणि व्हीसी/ओएव्हीएमद्वारे ईजीएममध्ये कसे सहभागी होऊ शकतात, याबाबतच्या सूचना ईजीएमच्या नोटीसीत नमूद आहेत.
- ज्या भागधारकांनी त्यांचा ई-मेल पत्ता नोंदणीकृत केलेला नाही त्यांनाही ईजीएमच्या नोटीसीत नमूद कामकाजावर, ईजीएमच्या नोटीसीत दिलेल्या पद्धतीने रिमोट ई-व्होटिंगद्वारे किंवा ईजीएम दरम्यान ई-व्होटिंगद्वारे मत नोंदविण्याची संधी असेल.
- कट-ऑफ दिनांक, म्हणजेच **गुरुवार, दिनांक ०८ ऑक्टोबर २०२६** रोजी, भौतिक किंवा डिमटेरियलाइज्ड स्वरूपात शेअर्स धारण करणारे सभासद, पूर्वा शेअरजिस्ट्री (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड यांच्या इलेक्ट्रॉनिक मतदान प्रणालीद्वारे, ईजीएमच्या नोटीसीत नमूद कामकाजावर इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मत नोंदवू शकतात. भागधारकांचे मतदानाचे अधिकार कट-ऑफ दिनांकास कंपनीच्या भरणा झालेल्या इक्विटी शेअर भांडवलातील त्यांच्या हिश्श्याच्या प्रमाणात असतील.

सर्व सभासदांना कळविण्यात येते की:

१. ईजीएमच्या नोटीसीत नमूद विशेष कामकाज इलेक्ट्रॉनिक मतदानाद्वारे पार पाडले जाईल;
२. रिमोट ई-व्होटिंग **सोमवार, दिनांक १२ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ९:०० वाजता (भारतीय प्रमाण वेळेनुसार)** सुरू होईल;
३. रिमोट ई-व्होटिंग **बुधवार, दिनांक १४ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ५:०० वाजता (भारतीय प्रमाण वेळेनुसार)** संपेल;
४. रिमोट ई-व्होटिंग कालावधी संपल्यानंतर, सदर सुविधा तात्काळ बंद (ब्लॉक) करण्यात येईल.
५. रिमोट ई-व्होटिंग किंवा ईजीएममधील ई-व्होटिंगद्वारे मतदानाची पात्रता निश्चित करण्यासाठीचा कट-ऑफ दिनांक **गुरुवार, ०८ ऑक्टोबर २०२६** असा आहे, आणि जी व्यक्ती कट-ऑफ दिनांकास सभासद नाही, तिने ही नोटीस केवळ माहितीसाठी समजावी;
६. ईजीएमची नोटीस पाठविल्यानंतर कंपनीचे शेअर्स संपादन करून सभासद होणारी आणि कट-ऑफ दिनांकास, म्हणजेच **गुरुवार, ०८ ऑक्टोबर २०२६** रोजी शेअर्स धारण करणारी कोणतीही व्यक्ती, ईजीएमच्या नोटीसीत दिलेल्या पद्धतीने लॉगिन आयडी व पासवर्ड तयार करण्याची प्रक्रिया अनुसरू शकते.

रिमोट ई-व्होटिंग प्रक्रियेद्वारे झालेल्या मतदानाचा निकाल **सर्वसाधारण सभा संपल्यानंतर दोन कामकाजाच्या दिवसांत** जाहीर करण्यात येईल. सदर निकाल, स्क्रुटिनायझरच्या अहवालासह, कंपनीच्या www.mcplworld.com या संकेतस्थळावर तसेच पूर्वा शेअरजिस्ट्री (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड यांच्या https://evoting.purvashare.com/ या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.

७. सभासदांनी कृपया नोंद घ्यावी की:

- रिमोट ई-व्होटिंगसाठी नमूद केलेल्या दिनांक व वेळेनंतर पूर्वा शेअरजिस्ट्री (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड यांच्यामार्फत रिमोट ई-व्होटिंग मॉड्यूल निष्क्रिय (डिसेबल) करण्यात येईल आणि एकदा सभासदाने एखाद्या ठरावावर मत नोंदविल्यानंतर, त्यात नंतर बदल करण्याची परवानगी दिली जाणार नाही;
- ज्या सभासदांनी ईजीएमपूर्वी रिमोट ई-व्होटिंगद्वारे मत नोंदविले आहे ते ईजीएमला उपस्थित राहू शकतात, परंतु त्यांना पुन्हा मत नोंदविण्याचा अधिकार असणार नाही;
- ईजीएममध्ये इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदानाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल;
- ज्या व्यक्तीचे नाव कट-ऑफ दिनांकास, म्हणजेच **गुरुवार, ०८ ऑक्टोबर २०२६** रोजी, सभासद नोंदवहीत/डिपॉझिटरींनी ठेवलेल्या लाभधारकांच्या यादीत नोंदलेले असेल, केवळ अशाच व्यक्तीला रिमोट ई-व्होटिंग तसेच ईजीएममधील ई-व्होटिंगची सुविधा घेण्याचा अधिकार असेल.
- कंपनीच्या संचालक मंडळाने श्री. विवेक रावल, प्रॅक्टिसिंग कंपनी सेक्रेटरी, यांची ई-व्होटिंग प्रक्रिया निष्पक्ष व पारदर्शक पद्धतीने पडताळण्यासाठी स्क्रुटिनायझर म्हणून नियुक्ती केली आहे.
- रिमोट ई-व्होटिंग तसेच ईजीएममधील ई-व्होटिंगसंदर्भात कोणत्याही शंका, अडचणी किंवा समस्यांबाबत, https://evoting.purvashare.com/ येथे उपलब्ध असलेले भागधारकांसाठीचे नेहमी विचारले जाणारे प्रश्न (एफएक्यू) व ई-व्होटिंग वापरकर्ता नियमपुस्तिका पाहावी किंवा पूर्वा शेअरजिस्ट्री (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड यांच्याशी evoting@purvashare.com या ई-मेलवर किंवा ०२२-४९६१४१३२ आणि ०२२-४९७००१३८ या क्रमांकांवर संपर्क साधावा. सभासद कंपनीलाही compliance@mcplworld.com या ई-मेलवर लेखी कळवू शकतात.

मनोज सिरॅमिक लिमिटेडसाठी
सही/-
ध्रुव राखासिया
व्यवस्थापकीय संचालक
दिनांकः २१.०९.२०२६ — **डीआयएनः ०३२५६२४६**
स्थळः मुंबई

नावातील बदल

पासपोर्ट मिळवण्यासाठी मी माझे नाव सुजामोल कक्कासेरिल अजयाई यावरून बदलून सुजा अजय असे करत आहे. (ज्याअर्थी सुजामोल कक्कासेरिल अजयाई हे जुने नाव आहे आणि सुजा अजय हे नवीन नाव आहे)

जाहीर सुचना

याव्दारे असे जाहीर करण्यात येते की, माझे अशील श्री. सुभाष रतनलाल आर्या है फ्लॅट क्र ६०३ ६ वा मजला बी विंग, जैनम हाईट्स को ऑपरेटीव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड, ५३७ – सुभाष नगर न्यू मिल रोड कुर्ला पश्चिम, मुंबई ४०० ०७० हा फ्लॅट सदर फ्लॅट चे मालक श्रीमती कुसुम शांतीलाल जैन, श्री. संजय शांतीलाल जैन आणि विमल शांतीलाल जैन यांच्याकडून आवश्यक त्या कागदपत्रांसह खरेदी करत आहेत.
तरी सदर प्रकरणी जर कोणालाही सदर मालमत्ते बाबतीत गहाण, बक्षीस पत्र, बोजा, भाडेपट्टा वहिवाट, वापर, ताबा, वारसाहक, करार, तारण किंवा इतर कोणत्याही मार्गाने कोणत्याही प्रकारची मागणी किंवा हरकत किंवा दावा असेल तर सदर व्यक्तीने नोटीस जाहीर झालेल्या तारखेपासुन ७ (सात) दिवसांचे आत लेखी पुराव्यानिशी खाली दिलेल्या पत्त्यावर लेखी कळवावे किंवा संपर्क साधावा तसे न केल्यास कोणालाही कोणत्याही स्वरुपाची हरकत नाही असे समजण्यात येईल व या नतंर आलेल्या हरकती अथवा तक्रारींचा विचार केला जाणार नाही याची संबंधितानी नोंद घ्यावी.

आपला नम्र
दिनांक २३.०९.२६ — **ॲड संदीप जी. पाटील**
ठिकाण मुंबई — पत्ता ॲड उमेश पाटील
ॲड असोसिएट्स खोत चाळ, कुर्ला कोर्टसमोर कुर्ला पश्चिम मुंबई ४०००७०
मोबाईल क्रमांक ९००४९९००३६/९७६९७६९२९४

जाहीर नोटीस

याद्वारे नोटीस देण्यात येते की, सौ. सविता एस. यादव आणि श्री. सिरोमन यादव हे सर्व्हे क्र. ४४ / प्लॉट क्र. २४, आनंद नगर, वसई रोड पश्चिम, गाव - नवघर, पालघर - ४०१२०२ येथे स्थित असलेल्या अरिहंत ज्योत को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि. म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरील फ्लॅट क्र. २०४ चे मालक आहेत.
सदर फ्लॅटचे मागील मालक श्री. ज्ञानेश्वर बाबुराव मोरे यांचे दिनांक १६/०४/२०२१ रोजी निधन झाले असून, त्यांच्या पश्चात सौ. विमल ज्ञानेश्वर मोरे (पत्नी), सौ. सुनंदा राजेंद्र कोटकर (मुलगी), सौ. प्रचिती प्रकाश सकपाळ (मुलगी) आणि सुनील डी. मोरे (मुलगा) हे त्यांचे एकमेव कायदेशीर वारस आहेत.
जर कोणाचाही वरील मालमत्तेवर किंवा त्याविरुद्ध कोणताही दावा, हक्क, मालकी हक्क किंवा हितसंबंध असल्यास, त्यांनी रीतसर नोटरीकृत / नोंदणीकृत / नोंदणी न केलेल्या आधारभूत कागदपत्रांसह लेखी स्वरूपात, या नोटिशीच्या तारखेपासून ०७ दिवसांच्या आत माझ्या कार्यालयात, म्हणजेच **ए. के. तिवारी,** वकील उच्च न्यायालय, ऑफिस क्र. १०, श्याम गार्डन सी. एच. एस. लि., विराट नगर, विरार (पश्चिम), पालघर - ४०१३०३ येथे कळवावे.
कसूर केल्यास, असे सर्व दावे सोडून दिले आहेत असे मानले जाईल आणि सदर फ्लॅटचा मालकी हक्क सर्व प्रकारच्या बोजांतून मुक्त आहे असे मानले जाईल.

सही/-
दिनांकः २३.०९.२०२६ — **ए. के. तिवारी**
ठिकाणः मुंबई — **(वकील उच्च न्यायालय)**

जाहीर नोटीस

याद्वारे माझे अशील म्हणजेच **श्रीमती आरती संतोष शेट्टी आणि श्री. संतोष सदानंद शेट्टी** यांच्या वतीने नोटीस देण्यात येते की, ते फ्लॅट क्र. १०१ चे मालक आहेत, ज्याचे सुपर बिल्ट-अप क्षेत्रफळ ३३.४५ चौ. मीटर म्हणजेच ३६० चौ. फूट आहे, जो 'विघ्नहर्ता दर्शन', विघ्नहर्ता दर्शन को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड या इमारतीच्या बी१ विंगच्या पहिल्या मजल्यावर स्थित आहे आणि ही इमारत जुना सर्वे क्र. ४७३ (भाग), नवीन सर्वे क्र. १५० (भाग), गाव नवघर, तालुका आणि जिल्हा ठाणे, नोंदणी उप-जिल्हा आणि जिल्हा ठाणे, सुंदर नगर, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, मीरा रोड (पूर्व), ठाणे - ४०१ १०७ येथे बांधलेली आहे (ज्याला यापुढे 'सदर मिळकत' असे संबोधले जाईल). मूळतः श्री. तुकाराम भिवा चव्हाण यांनी दिनांक ०१.१२.१९९८ च्या नोंदणीकृत विक्री करारानुसार मे. सुंदर डेव्हलपर्सचे मालक श्री. शैलेश सेवंतीलाल शाह यांच्याकडून सदर मिळकत खरेदी केली होती. फ्लॅट खरेदीदारांनी २००३-०४ या वर्षात विघ्नहर्ता दर्शन को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड नावाची सोसायटी स्थापन करून तिची नोंदणी केली आणि श्री. तुकाराम भिवा चव्हाण यांना सदस्य म्हणून प्रवेश दिला व त्यांच्या नावे २१ ते २५ हे विशिष्ट क्रमांक असलेले ५ शेअर्स असलेले शेअर प्रमाणपत्र क्र. ५ जारी केले. त्यानंतर श्री. तुकाराम भिवा चव्हाण यांच्याकडून दिनांक १७.०८.२०२० च्या नोंदणीकृत विक्री करारानुसार श्री. राजन भिकाजी कुंभार आणि श्रीमती शिल्पा राजन कुंभार यांनी सदर मिळकत संयुक्तपणे खरेदी केली. सोसायटीने त्यांना सदस्य म्हणून प्रवेश दिला आणि त्यांच्या संयुक्त नावे शेअर प्रमाणपत्र हस्तांतरित केले. श्री. राजन भिकाजी कुंभार आणि श्रीमती शिल्पा राजन कुंभार यांच्याकडून माझ्या अशिलांनी सदर मिळकत खरेदी केली आहे. तथापि, असे निदर्शनास आले आहे की सदर मिळकत मूळ मालक श्री. तुकाराम भिवा चव्हाण यांनी दिनांक ०४.०६.२००३ च्या गहाण खताद्वारे जीपीओ, मुंबई यांच्याकडे गहाण ठेवली होती. हे गहाण सोडवल्याचा पुरावा म्हणून जीपीओ, मुंबई यांनी श्री. तुकाराम भिवा चव्हाण यांच्या नावे निष्पादित केलेले नोंदणीकृत पुनर्हस्तांतरण खत उपलब्ध नाही. आता (१) श्री. राजन भिकाजी कुंभार आणि (२) श्रीमती शिल्पा राजन कुंभार यांच्याकडून दिनांक १५.०७.२०२६ च्या नोंदणीकृत विक्री करारानुसार माझ्या अशिलांनी सदर मिळकत खरेदी करण्याचे मान्य केले आहे.
सदर मिळकतीमध्ये किंवा सदर मिळकतीच्या मूळ मालकी हक्काच्या कागदपत्रांमध्ये कोणाचाही विक्री, गहाण, अभिहस्तांकन, प्रभार, विश्वस्त, धारणाधिकार, ताबा, बक्षीस, वारसा हक्क, देखभाल, भाडेकरू हक्क, भाडेपट्टा, सुखाधिकार किंवा अन्य कोणत्याही प्रकारे कोणताही दावा किंवा हितसंबंध असल्यास, त्यांनी या नोटीसच्या प्रकाशनाच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खाली नमूद केलेल्या पत्त्यावर खालील स्वाक्षरीकर्त्यांना त्याबाबतच्या पुराव्यांसह (आणि अन्यथा नाही) लेखी स्वरूपात कळवावे; तसे न केल्यास सदर मिळकत सर्व प्रकारच्या बोजांपासून मुक्त आहे असे माझे अशील गृहीत धरतील आणि त्यानंतर प्राप्त झालेला कोणताही दावा सोडून दिला आहे/माफ केला आहे असे मानले जाईल.

दिनांकः २३.०९.२०२६ — **सही/-**
ठिकाणः मुंबई — **श्रीमती सावित्री नवीन पुजारी**
वकील उच्च न्यायालय,
पत्ताः ३०१, तिसरा मजला, स्टर्लिंग सीएचएस लिमिटेड, लक्ष्मीनारायण मंदिराजवळ, एक्सर, बोरिवली (पश्चिम), मुंबई - ४०० ०९१.

तमिळनाड मर्कंटाईल बँक लिमिटेड

TMB — Tamilnad Mercantile Bank Ltd — Be a step ahead in life

अंधेरी पश्चिम शाखा पत्ताः युनिट क्र. २५, २६ आणि २७, लक्ष्मी प्लाझा, लक्ष्मी इंडस्ट्रियल इस्टेट, न्यू लिंक रोड, अंधेरी (पश्चिम), मुंबई - ४०००५३.
दूरध्वनी क्र.: ०२२ २६३६६२४०/२६३६६२६० मोबाईल क्र.: ९८७०९८९१९८
ई-मेलः andheriwest@tmb.bank.in
सीआयएनः L65110TN1921PLC00190

लिलाव विक्री नोटीस

याद्वारे सूचित करण्यात येते की, तमिळनाड मर्कंटाईल बँक लिमिटेडच्या ताब्यात असलेले खालील वेळापत्रकात नमूद केलेले वाहन ०१.१०.२०२६ रोजी दुपारी ०३:३० वाजता तमिळनाड मर्कंटाईल बँक लिमिटेड, मुंबई अंधेरी पश्चिम शाखा येथे "जसे आहे जेथे आहे" तत्त्वावर खुल्या लिलावाद्वारे विकले जाईल.

अनु. क्र.	कर्ज खाते क्र.	कर्जदाराचे नाव आणि पत्ता, वाहनाचा तपशील	नोंदणी क्र.	मॉडेल / वर्ष
१.	214700480100265	**श्रीमती रुबी मुकेश गुप्ता (श्री. मुकेश गुप्ता यांची पत्नी), प्रोप्रायटरः मे. अनुष्का टूर्स अँड ट्रॅव्हल्स,** पत्ताः ६०७/ए, इमारत क्र. १, बापू बागवे रोड, रावळ पाडा, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०००६८.	MH47BL5567	ह्युंदाई ऑरा 1.2MT CNG S टायटन ग्रे २०२३ मॉडेल

वरील वाहनाची राखीव किंमतः रु. ४,१०,०००/- (रुपये चार लाख दहा हजार मात्र)

अटी आणि शर्तीः

१. लिलावात भाग घेऊ इच्छिणाऱ्यांनी लिलावाच्या तारखेला म्हणजेच ०१.१०.२०२६ रोजी दुपारी ०२:०० वाजेपर्यंत किंवा त्यापूर्वी "तमिळनाड मर्कंटाईल बँक लिमिटेड" च्या नावे काढलेल्या डिमांड ड्राफ्टद्वारे राखीव किंमतीच्या १०% म्हणजेच रु. ४१,०००/- (रुपये एकेचाळीस हजार मात्र) इसार रक्कम (ईएमडी) म्हणून जमा करणे आवश्यक आहे.
२. **वरील वाहन तमिळनाड मर्कंटाईल बँक लिमिटेड, मुंबई अंधेरी पश्चिम शाखेच्या शाखा व्यवस्थापकांची पूर्वपरवानगी घेतल्यानंतर सर्व कामकाजाच्या दिवशी सकाळी १०:०० ते सायंकाळी ०५:०० या वेळेत पाहता येईल.**
३. यशस्वी बोलीदाराने त्याच्या/तिच्या/त्यांच्या नावे विक्री निश्चित झाल्यावर त्वरित बोलीच्या रकमेच्या २५% रक्कम (इसार रक्कम वजा करून) जमा करणे आवश्यक आहे. उर्वरित बोली रक्कम ७ दिवसांच्या आत भरणे आवश्यक आहे.
४. ७ दिवसांच्या आत उर्वरित बोली रक्कम भरण्यात अयशस्वी झाल्यास, बोलीदार केवळ वाहनावरील आपला अधिकारच गमावणार नाही, तर त्याची इसार रक्कम देखील जप्त केली जाईल.
५. संबंधित प्रादेशिक परिवहन कार्यालयात (आरटीओ) नाव हस्तांतरणाच्या प्रक्रियेबाबतचा सर्व खर्च यशस्वी बोलीदाराने उचलणे आवश्यक आहे.
६. सहभागींना कोणतीही कारणे न देता बोली स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा किंवा लिलाव विक्री तहकूब/रद्द करण्याचा परिपूर्ण अधिकार शाखा व्यवस्थापकांकडे राहील.
७. हे प्रकाशन कर्जदारासाठी नोटीस म्हणून देखील मानले जाईल.
८. वाहनाचा लिलाव राखीव किंमतीपेक्षा कमी दराने केला जाणार नाही.
९. केवळ जे बोलीदार इसार रक्कम (ईएमडी) जमा करतील त्यांनाच लिलाव विक्रीमध्ये भाग घेण्याची परवानगी दिली जाईल.

इच्छुक बोलीदारांनी त्यांच्या ओळखीचा कोणताही एक पुरावा सोबत आणणे आवश्यक आहे, उदा. पासपोर्ट, पॅन कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, रेशन कार्ड इ.

शाखा प्रमुख,
ठिकाणः अंधेरी पश्चिम, मुंबई — **तमिळनाड मर्कंटाईल बँक लिमिटेड,**
दिनांकः २२.०९.२०२६ — **अंधेरी पश्चिम, मुंबई, ९८७०९८९१९८.**

बैंक ऑफ़ बड़ौदा / Bank of Baroda

माहेश्वरी उद्यान, माटुंगा शाखा, ४६७-ए, व्होरा भवन, माटुंगा, मुंबई - ४०००१९.
ई-मेलः **Dbmatu@Bankofbaroda.bank.in**

स्थावर मालमत्तांच्या विक्रीसाठी विक्री नोटीस "परिशिष्ट- IV-ए [नियम ६(२) आणि ८(६) च्या तरतुदी पहा]

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ६(२) आणि ८(६) च्या तरतुदींसह वाचलेल्या सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री नोटीस.

याद्वारे सर्वसामान्य जनतेला आणि विशेषतः कर्जदार, गहाणदार आणि जामीनदार यांना नोटीस देण्यात येते की, खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता जी सुरक्षित धनकोकडे गहाण/प्रभारित आहे, जिचा प्रत्यक्ष ताबा बँक ऑफ बडोदा, सुरक्षित धनकोच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी घेतला आहे, ती खाली नमूद केलेल्या खात्यामधील/खात्यांमधील थकीत रकमेच्या वसुलीसाठी "जसे आहे जेथे आहे", "जसे आहे तसे आहे", आणि "जे काही आहे तेथे आहे" तत्त्वावर विकली जाईल. कर्जदार/गहाणदार/जामीनदार/सुरक्षित मालमत्ता/थकीत रक्कम/राखीव किंमत/ई-लिलावाची तारीख आणि वेळ, ईएमडी आणि बोली वाढीची रक्कम यांचे तपशील खाली दिले आहेत –

अ. क्र.	कर्जदार / जामीनदार / गहाणदाराचे नाव आणि पत्ता	ज्ञात बोजांसह (असल्यास) स्थावर मालमत्तेचे सविस्तर वर्णन	एकूण थकीत रक्कम	१. ई-लिलावाची तारीख २. ई-लिलावाची वेळ (सुरुवातीची वेळ ते समाप्तीची वेळ)	१. राखीव किंमत २. इसारा रक्कम (ईएमडी) ३. बोली वाढीची रक्कम	ताब्याची स्थिती (प्रातिनिधिक/ प्रत्यक्ष)	मालमत्तेच्या तपासणीची तारीख आणि वेळ
१	**श्री. रीदीर बी. जाधव (कर्जदार)** **पत्ता**ः सी/ओ भिका जाधव, रूम क्र. १८, तळमजला, एन. ए. सावंत मार्ग, कुलाबा फायर स्टेशन, मुंबई – ४००००५. **श्रीमती लता रीदीर जाधव** (सह-अर्जदार) पत्ताः सी/ओ भिका जाधव, रूम क्र. १८, तळमजला, एन. ए. सावंत मार्ग, कुलाबा फायर स्टेशन, मुंबई – ४००००५.	खालीलप्रमाणे वर्णन केलेल्या मालमत्तेचा संपूर्ण भाग आणि पार्सल ज्यामध्ये गट क्र. ४६५, भैरवनाथ मंदिराजवळ, गाव वेळू, तालुका भोर, जिल्हा पुणे – ४१२२०५ येथे स्थित असलेल्या साई सृष्टी अपार्टमेंटमधील ४थ्या मजल्यावरील फ्लॅट क्र. ४०५, ज्याचे बिल्ट-अप क्षेत्रफळ ६२६ चौ. फूट आहे. बँकेला ज्ञात असलेले बोजेः ज्ञात नाही.	रु. ६२.०३ लाख + न लावलेले व्याज + इतर शुल्क	१. ई-लिलावाची तारीखः २८-१०-२०२६ २. ई-लिलावाची वेळः सुरुवातीची वेळः दुपारी ०२:०० ते समाप्तीची वेळः सायंकाळी ०६:००	१. राखीव किंमतः रु. १७,४६,५४०.०० २. इसारा रक्कम (ईएमडी): रु. १,७४,६५४.०० ३. बोली वाढीची रक्कमः रु. २५,०००.००	प्रत्यक्ष ताबा	१५-१०-२०२६ सुरुवातीची वेळः सकाळी ११:०० ते समाप्तीची वेळः दुपारी ०४:००
२	**श्री. रीदीर बी. जाधव (कर्जदार)** **पत्ता**ः सी/ओ भिका जाधव, रूम क्र. १८, तळमजला, एन. ए. सावंत मार्ग, कुलाबा फायर स्टेशन, मुंबई – ४००००५. **श्रीमती लता रीदीर जाधव (सह-अर्जदार)** **पत्ता**ः सी/ओ भिका जाधव, रूम क्र. १८, तळमजला, एन. ए. सावंत मार्ग, कुलाबा फायर स्टेशन, मुंबई – ४००००५.	खालीलप्रमाणे वर्णन केलेल्या मालमत्तेचा संपूर्ण भाग आणि पार्सल ज्यामध्ये गट क्र. ४६५, भैरवनाथ मंदिराजवळ, गाव वेळू, तालुका भोर, जिल्हा पुणे – ४१२२०५ येथे स्थित असलेल्या साई सृष्टी अपार्टमेंटमधील ४थ्या मजल्यावरील फ्लॅट क्र. ४०६, ज्याचे बिल्ट-अप क्षेत्रफळ ६२६ चौ. फूट आहे. बँकेला ज्ञात असलेले बोजेः ज्ञात नाही.		१. ई-लिलावाची तारीखः २८-१०-२०२६ २. ई-लिलावाची वेळः सुरुवातीची वेळः दुपारी ०२:०० ते समाप्तीची वेळः सायंकाळी ०६:००	१. राखीव किंमतः रु. १७,४६,५४०.०० २. इसारा रक्कम (ईएमडी): रु. १,७४,६५४.०० ३. बोली वाढीची रक्कमः रु. २५,०००.००	प्रत्यक्ष ताबा	१५-१०-२०२६ सुरुवातीची वेळः सकाळी ११:०० ते समाप्तीची वेळः दुपारी ०४:००

विक्रीच्या सविस्तर अटी आणि शर्तीसाठी, कृपया https://www.bankofbaroda.in/e-auction या वेबसाईट लिंकचा आणि ऑनलाइन लिलाव पोर्टल https://baanknet.com चा संदर्भ घ्या/भेट द्या. तसेच, संभाव्य बोलीदार प्राधिकृत अधिकाऱ्यांशी ९५४९११४८९९ / ८६५२६३९८३९ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधू शकतात.

दिनांकः २२-०९-२०२६ — **प्राधिकृत अधिकारी**
ठिकाणः मुंबई — **बँक ऑफ बडोदा**